N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. District (जिल्हा): अहिल्यानगर P.S.(ठाणे): पाथर्डी
FIR No.(प्रथम खबर क्र.): 1152 Year (वर्ष): 2026
Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):20/09/2026 08:59

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):
1. Day(दिवस): दरमियानी दिन
Date From (दिनांक पासून): 18/09/2026
Date To ( दिनांक पर्यंत): 19/09/2026
Time Period (कालावधी):
Time From (वेळेपासून): 05:00 बजे
Time To (वेळेपर्यंत): 04:30 बजे

(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):
Date (दिनांक ): 20/09/2026 Time (वेळ): 08:30 बजे

(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):
Entry No. (नोंद क्र.): 003
Date & Time (दिनांक आणि वेळ): 20/09/2026 08:58 बजे

4. Type of Information (माहितीचा प्रकार): लेखी

5. Place of Occurrence (घटनास्थळ):
1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):
पूर्व, 03 किमी
Beat No. (बिट क्र.):
(b) Address (पत्ता): माणिकदौंडी चौक पाथर्डी

(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):
District(State) (जिल्हा(राज्य)):



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** संतोष रविंद्र पैलकर
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1976
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्र,पाथर्डी,अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्र,पाथर्डी,अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-9823103102

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विनोद शिवाजी मासाळकर | | | 1. पाथर्डी पोलीस ठाणे,,पाथर्डी, अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with OKEN Scanner

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., If any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद — पाथर्डी पोलीस ठाणे,
दिनांक :- २०/०९/२०२६

मी संतोष रविंद्र पैलकर, वय ५० वर्षे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक.सरकारतर्फे फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक या कार्यालयात सुमारे २ वर्षापासुन कार्यरत आहे. मा. पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक यांनी आम्हास दिनांक १७/०९/२०२६ रोजी तकारदार यांचा संपर्क कमांक देवुन पुढील कार्यवाही करणेबाबत आदेशीत केले. त्यानुसार आम्ही तकारदार यांना ९६०४३५५७८८ या कमांकावर संपर्क करुन त्यांचे नाव व तकारीबाबत विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री. बाबासाहेब घुले असे सांगुन त्यांची एक लोकसेवकाविरूध्द लाचेची मागणी करीत असलेबाबत तकार असल्याचे सांगुन दिनांक १८/०९/२०२६ रोजी पाथर्डी येथे येण्यास सांगितले व त्यानंतर ते पुढील तकार देणार असल्याबाबत सांगितले. त्यानंतर आम्ही दिनांक १७/०९/२०२६ रोजी मा. उपायुक्त (प्रशासन), नाशिक महानगर पालिका, नाशिक यांना त्यांचेकडील दोन कर्मचारी दि.१८/०९/२०२६ रोजी सकाळी ०५:०० वा. उपलब्ध करुन देणेबाबत पत्र दिले असता त्यांनी त्यांचे कार्यालयाकडील १) श्री. कुणाल विकास जाधव, वयः ३४वर्षे, रा- कैलास बंगलो, दक्षिणमुखी विरहनुमान मंदीर जवळ, उदय नगर, मखमलाबाद रोड, जि. नाशिक. २) श्री. भुषण प्रकाश निरभवणे, वय ४० वर्षे, रा अनुश्री अपार्टमेंट, फ्लॅट नं.९, जयअंबे कॉलनी, जुना सायखेडा रोड, जेलरोड, नाशिकरोड. जि. नाशिक. दोघे नेम-घरपट्टी विभाग पुर्व, नाशिक महानगर पालिका, नाशिक. यांना उपलब्ध करुन दिले. सदरचे पंच दि.१८/०९/२०२६ रोजी आमचे कार्यालयात ०५:०० वाजता उपस्थित झाले. तेव्हा आम्ही दोन्ही पंचाना आमची व सापळा पथकाची यांची ओळख करुन देवून तक्रारदार श्री. बाबासाहेब घुले, रा. कोरडगाव, पाथर्डी जि. अहिल्यानगर यांचेकडे लोकसेवक लाचेची मागणी करीत असुन त्यांची तकार ऐकुन, तकार नोंदवुन त्याप्रमाणे पुढील कारवाई करणेकरिता आपणांस पाथर्डी जि. अहिल्यानगर येथे जायचे असलेबाबत सांगितले.

त्यानंतर आम्ही, दोन्ही पंच, सापळा पथकातील पोहवा/खैरणार, पोहवा/पवार व पोशि/शिंदे सरकारी वाहन क. एम. एच.१५.जे.एस.३१८६ हिचेने सापळा कारवाईकामी लागणाऱ्या साहित्यासह ०५:३० वाजेच्या सुमारास पाथर्डी जि. अहिल्यानगर येथे रवाना झालो, प्रवासादरम्यान तकारदार यांचेशी फोनवरुन झालेल्या संभाषणानुसार पाथर्डी गावातील नारायण पाटील मंगल कार्यालयाच्या समोर मोकळया जागी पोहचलो. ती वेळ साधारण १०:४५ वाजेची होती. त्यानंतर एक दुचाकी वरील इसम यांनी आम्हाला हात करून त्यांचे पाठीमागे येण्यास सांगुन शेताच्या रस्त्याला मोकळया जागेत घेवुन जावुन शेताच्या आत मधील बाजुस पायवाटेस जावुन एक इसम उभा असलेल्या ठिकाणी जावुन थांबले. त्यानतर आम्ही त्यांचेकडे जावुन त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव बाबासाहेब घुले असे सांगुन त्यांचेशीच फोनवर बोलणे झाले बाबत सांगितले. तेव्हा आम्ही त्यांना आमची, दोन्ही पंचाची वसापळा पथकातील सदस्यांची आपआपसात ओळख करुन दिली. त्यानंतर आम्ही तकारदार यांना दोन्ही पंचासमक्ष त्यांचे पुर्ण नाव, गाव, पत्ता व तकारीबाबत विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव बाबासाहेब घुले असे सांगुन तक्रारदार ते नसुन त्यांचे सोबत उभे असलेले त्यांच्या मित्राची असले बाबत सांगितले. त्यानंतर आम्ही त्यांचे सोबत उभे असलेल्या इसमास त्यांचे नाव गाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव. तुशिप निजाम शेख, वय-२९, रा- आठरे किराणा दुकाना जवळ, जुनी पंचायत समिति रोड, पाथर्डी, जि.अहिल्यानगर असे सांगुन त्याचीच एका लोकसेवकाविरूध्द तकार असलेबाबत सांगितले असुन त्याचा सारांश पुढीलप्रमाणे. तकारदार याचे पाथर्डी शहरात युनिक हॉटेल व रेस्टॉरंट नावाचे हॉटेल त्यामध्ये प्रताप साळुंके उर्फ भावडया हा पार्ट टाईम हेल्पर चे काम करतो. दि. १४/०९/२०२६ रोजी दुपारी ०४:०० वा. सुमारास प्रताप उर्फ भावडया व त्याचा लहान भाउ असे घरी जात असतांना पाथर्डी गावातील विजय मारूती मंदीर जवळ त्यांचे व एका अनोळखी ट्रक चालक यांचे सोबत गाडीला कट मारला या कारणावरून भांडण झाले होते. त्यात प्रताप उर्फ भावडया याला ट्रक चालक व त्याचे सोबतचे क्लीनरने



Scanned with OKEN Scanner

त्यांचेकडील लोखंडी रॉड ने मारहाण केली, त्यात प्रताप याच्या डोक्याला दुखापत झाली. त्यावेळी तेथे उपस्थित
असलेल्या लोकांनी गावातील मुलाला मारहाण केली म्हणुन अनोळखी ट्रक चालकास मारहाण केली. त्यात त्यांना
देखील दुखापत झालेली होती. त्यानंतर प्रताप उर्फ भावडया याला दुखापत झालेली असल्याने त्याला प्रथम पाथर्डी
येथील शासकिय दवाखान्यात व नंतर अहिल्यानगर येथील शासकिय दवाखान्यात उपचाराकामी दाखल करण्यात
आले होते.

त्यानंतर तकारदार काल्या शेख याला दि.१७/०९/२०२६ रोजी पाथर्डी पोलीस ठाणेकडील पोलीस विनोद
मासाळकर यांनी फोन करून पोलीस स्टेशन ला बोलावुन घेतले व सांगितले की, तुझ्याकडे काम करणारा प्रताप उर्फ
भावडया व अरबाज यांनी व त्यांच्या मित्रांनी घोडेगावमधील ट्रक चालकाला मारहाण करून रॉबरी केली असुन तो
ट्रक चालक उदया जबाब देणार आहे. तेव्हा आम्ही तुझ्या हॉटेल वरील कामगार भावडयावर रॉबरी केली आणि जबर
मारहाण केली म्हणुन हाफ मर्डरचा गुन्हा दाखल करणार आहे, आणि साहेबांनी तुम्हा लोकांना पण आरोपी करा असे
सांगितलेले आहे, असे सांगितले तेव्हा तक्रारदार काल्या शेख म्हणाला की, विनोद भाउ तुम्हाला माहीत आहे आम्ही
कोणीच नव्हतो, फक्त प्रताप उर्फ भावडया होता. आणि तो मुलगा शांत स्वभावाचा आहे तो कधी कुनाशी भांडन करू
शकत नाही आणि तुम्ही आमचे मुलांचे पण नाव टाकुन रॉबरी आणि हाफ मर्डरचा गुन्हा दाखल करत आहे. असे
नका करू असे म्हटले, त्यावेळी लोकसेवक मासाळकर म्हटले की, साहेबानीच सांगितले आहे असा गुन्हा दाखल
करायला, तर करावाच लागेल. त्यावेळी तकारदार काल्या शेख यांनी सांगितलं की, तुम्हाला माहीत आहे, प्रताप उर्फ
भावडया शिवाय तेथे आम्ही कोणीच नव्हतो, तुम्ही असे खोटे गुन्हयात आम्हाला नका अडकवु, तुम्हीच काहीतरी
करा. लोकसेवक विनोद मासाळकर हे म्हणाले कि, मी काहीतरी करतो आणि तुझे गुन्हयात नाव येवु देत नाही. पणु
तु त्यांच्याकडुन आम्हाला पैसे काढुन दे. कारण त्यासाठी तुला साहेबांना व मला असेमिळुन ५लाख रूपये दयावे
लागतील. त्यावेळी तकारदार काल्या शेख यांनी पाच लाख रूपये खुप होतात आणि प्रताप माझ्याकडे काम करतो.
त्याचे कडुन पाच लाख रूपये कसे जमा करून देवु शकतो? असे सांगितले. तेव्हा लोकसेवक मासाळकर म्हणाले की,
साहेबांशी बोलुन मी काहीतरी मॅनेज करतो आणि रॉबरी आणि हाफ मर्डर पेक्षा ३२४ किंवा मेडिकल सर्टिफिकेट
आले तर ३२६ याच्यापैकी काहीतरी कलमा प्रमाणे गुन्हा दाखल करतो असे म्हणुन तु पैसे तयार ठेव, बाकी मी
बघुन घेईन. त्यानंतर तकारदार काल्या शेख तेथुन निघुन गेले. दि. १८/०९/२०२६ रोजी पाथर्डी पोलीस ठाणेत
प्रताप उर्फ भावडया, ओम चव्हाण, व अरबाज पठाण यांचे विरुध्द पाथर्डी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल
करण्यात येणार होता. आणि प्रताप उर्फ भावडया व अरबाज हा तकारदाराकडे कामाला असल्याने लोकसेवक
मासाळकर यांनी तक्रारदारास आज भेटायला बोलावले असल्याने तक्रारदार काल्या शेख हे लोकसेवक मासाळकर
यांची भेट घ्यायला पाथर्डी पोलीस ठाण्याला भेटायला जाणार आहे. तेव्हा लोकसेवक मासाळकर हे तक्रारदाराकडे
प्रताप व अरबाज यांचे विरुध्द दाखल गुन्हयात तपासात मदत करणेच्या मोबदल्यात पाच लाख रूपयेची मागणी
केल्यास त्यांचेवर कारवाई करण्याची विनंती केली.सदर तकार आम्ही व दोन्ही पंचानी वाचली असुन त्यावर
तक्रारदार यांची व समक्ष म्हणुन आम्ही व दोन्ही पंचाच्या सहया आहेत. तकारदार काल्या शेख यांना लोकसेवक
यांचा गुन्हा दाखल केले नंतर फोन करणार होते परंतु लोकसेवक यांचा फोन न आल्याने आम्ही दि.१८/०९/२०२६
रोजीची कारवाई स्थिगीत करून दि.१९/०६/२०२६ रोजी करण्याचे नियोजीत केले. तकारदार यांनी वरील प्रमाणे
तकार दिल्याने त्यांचे तकारीप्रमाणे तकारदार यांचे हॉटेलवर काम करणा-या प्रताप उर्फ भावडया व अरबाज यांचेवर
हाफ मर्डर व रॉबरी च्या गुन्हयाच्या ऐवजी ३२४ व मेडिकल सर्टिफिकेट आल्यावर ३२६ प्रमाणे गुन्हा दाखल
करण्याच्या मोबदल्यात ५,००,०००/- रु. लाचेची मागणी करतात अगर कसे? याची पडताळणी करण्यासाठी?
तकारदार श्री. काल्या शेख व त्यांचेसोबत पंच नं. १ म्हणुन श्री. कुणाल जाधव व तकारदार यांचा हॉटेलवर काम
करणारा प्रताप उर्फ भावडया यांना पाठविण्याचे ठरले. त्यानंतर तकारदार व पंच नं.१ श्री. जाधव यांना योग्य त्या
सुचना देवुन व्हॉईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन ते सुरु करून ते तकारदार यांचे फुल बाहीचा टि शर्टच्या
आत बनियनला उजव्या बाजुस सेफ्टी पिनने लावुन तकारदार याचे चारचाकी वाहन क.एम.एच.१२ ऐडब्ल्यु.
०६१२ने संग्राम हॉटेलच्या मागील बाजूस असलेल्या मोकळया जागेतुन रवाना केले. ती वेळ साधारण १२:२३
वाजेची होती. त्यानंतर आम्ही सदर ठिकाणी खाजगी वाहनात थांबुन राहिलो. काही वेळाने तकारदार व पंच आम्ही
थांबलेल्या ठिकाणी परत आले ती वेळ साधारण १३:५३ वाजेची होती. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांचेकडील
व्हॉईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद केले. तेव्हा आम्ही पंच नं. १ श्री. जाधव यांना तक्रारदार यांचेसोबत लोकसेवक
श्री. मासाळकर यांचे भेटीकरिता रवाना केले पासुन घडलेल्या घटनेविषयी विचारले असता त्यांनी पुढीलप्रमाणे
हकीगत सांगितली.पंच नं. १ हे तकारदारासोबत लोकसेवक विनोद मासाळकर यांचे भेटीकरिता रवाना केले, त्यावेळी
आम्ही पाथर्डी-खरवंडी रोड वरून पाथर्डी पोलीस ठाणे येथे गेले व तेथुन तकारदार श्री. काल्या शेख यांनी
लोकसेवक मासाळकर यांना फोन केला असता लागलीच काही वेळात तक्रारदार यांचे चारचाकी गाडी जवळ आले.



Scanned with OKEN Scanner

त्यावेळी तक्रारदार श्री. काल्या शेख यांचेत व समोरील व्यक्तीत कामाचे संबंधाने बोलणे सुरु झाले त्यादरम्यान
लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे, तुला मी पहिल्या दिवशी किती सांगितले" असे विचारले असता तकारदार
काल्याशेख यांनी "५ लाख रूपये सांगितले" असे म्हणल्यावर लोकसेवक यांनी "हा.... मी आणले कितीवर" असे
म्हटल्यावर तकारदार काल्या शेख यांनी "दोन लाख पंधरा हजारावर आणलं ना" असे म्हटले व त्यानंतर लोकसेवक
म्हटले की, "आणि मग.." असे म्हणुन दोन लाख पंधरा हजार रुपये लाचेची मागणी केली.
त्यानंतर आम्ही तक्रारदार यांचेकडुन ताब्यात घेतलेले व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार व लोकसेवक
मासाळकर यांचेत रेकॉर्ड झालेले संभाषण आम्ही, दोन्ही पंचानी व सापळा पथकाने ऐकले असता त्यातील
संभाषणावरुन लोकसेवक मासाळकर यांनी तक्रारदार श्री. काल्या शेख यांचेकडे, "दोन लाख पंधरा हजार रूपये
लाचेची मागणी केली असल्याचे आमची व पंचाची खात्री झाली.तसेच लोकसेवक मासाळकर यांनी तक्रारदार यांना
लाचेची रक्कम घेवुन त्वरीत बोलविले असल्याने सदर संभाषणाची स्क्रिप्ट व संभाषणाच्या हॅशव्हॅल्युची प्रिंट यशस्वी
सापळा कारवाई नंतर करण्याचे सर्वानुमते ठरले. त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री. काल्या शेख यांना लोकसेवक
मासाळकर यांना लाच म्हणुन देण्याकरिता लाचेची रक्कम हजर करण्यास सांगितले असता त्यांनी त्यांचेकडे एक
लाख रूपये उपलब्ध झाल्याने १,००,०००/- रुपये त्यात ५००/- रुपये दराच्या २०० चलनी नोटा हजर केल्या,
सदर नोटांचे क्रमांक आमचे सुचनेवरुन पोहवा/पवार यांनी एका कोऱ्या कागदावर लिहुन घेतले. त्यानंतर आमचे
सुचनेवरुन पोहवा/पवार यांनी लाचेच्या नोटांना अॅन्थ्रासिन पावडर लावुन त्याचे प्रात्यक्षिक करुन दाखविले.
त्यानंतर आमचे सुचनेवरुन पोहवा/पवार यांनी तक्रारदार श्री. काल्या शेख यांचे पॅन्टच्या मागील बाजुचे उजव्या
खिशात अॅन्थ्रासिन पावडर लावलेल्या नोटा ठेवुन त्यांना व पंच नं. १ श्री. जाधव यांना लोकसेवक मासाळकर
यांचे भेटीकरिता तक्रारदार यांचेकडील चारचाकी वाहन क. एम.एच.१६. सीव्ही. ४२५५ ने पाथर्डी-खिरवंडी
रोडवरील संग्राम हॉटेलच्या मागील बाजुस असलेल्या मोकळ्या जागेमधुन १५:५१ वाजेचे दरम्यान रवाना
केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही तक्रारदाराच्या दुस-या खाजगी वाहनाने त्याच्या मित्रांसह लाचेच्या सापळा कारवाई
करणेकामी रवाना झालो. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांचे चारचाकी वाहन पाथर्डी पोलीस स्टेशन जवळील पाण्याच्या
टाकीजवळ थांबविले, त्यावेळी आम्ही आमचे कडील खाजगी वाहन काही अंतरावर थांबवुन व वाहनाचे खाली उतरुन
तेथील परिसरात आमचे व सापळा पथकातील सदस्यांचे अस्तित्व लक्षात येणार नाही असे थांबुन सापळा आयोजित
केला. त्यानंतर काही वेळाने तकारदार त्यांचे मोबाईल वरून आमचे सोबतखाजगी चारचाकी मध्ये तकारदार यांचे
मित्राला फोन करून लाच स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजित इशारा केला ती वेळ १६:०३ वाजेच्या सुमाराची होती
त्यावेळी लोकसेवक विनोद मासाळकर यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे.
त्यानंतर आमचे सुचनेवरुन पोहवा/पवार यांनी तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन ताब्यात घेतले.
त्यावेळी आम्ही तेथे उभे असलेले पंच श्री. जाधव यांना लाचेची रक्कम कोणी स्विकारली व कोठे ठेवलीबाबत
विचारले असता त्यांनी तेथे गाडीत बसलेल्या लोकसेवक मासाळकर यांचेकडे इशारा करून त्यांनी तक्रारदार काल्या
शेख यांचेकडुन लाचेची रक्कम उजव्या हाताने स्विकारुन ती दोन्ही पायांत मांडीवर ठेवली बाबत सांगितले. त्यावेळी
आम्ही लोकसेवक यांनी त्यांचे मांडीवर ठेवलेली लाचेची रक्कम ताब्यात घेवुन तिला एका सफेद रंगाच्या कागदात
गुंडाळुन आमचे ताब्यात घेतली. तरी यातील आरोपी लोकसेवक विनोद शिवाजी मासाळकर, वय ३७वर्षे, व्यवसाय-
नोकरी, पोलीस शिपाई, ब.नं.२४६७, पाथर्डी पोलीस ठाणे, जि. अहिल्यानगर यांनी दिनांक १९/०९/२०२६ रोजी
पडताळणी कारवाई दरम्यान तकारदार श्री.तुशीप उर्फ काल्या शेख यांचे तकारीप्रमाणे त्यांचे हॉटेलवर काम करणा-
या प्रताप उर्फ भावड्या व अरबाज यांचेवर हाफ मर्डर व रॉबरी चा गंभीर गुन्हा दाखल न करता, ३२४ व मेडिकल
सर्टिफिकेट आल्यावर ३२६ प्रमाणे सौम्य गुन्हा दाखल करण्या करीता तसेच तपासात मदत करण्याचे प्रलोभन देवुन
तकारदार तुसीप उर्फ काल्या शेख यांचेकडे वरीष्ठांच्या नावाचा प्रभाव टाकुन स्वतः करीता पाच लाख रूपये लाचेची
मागणी करून तडजोडीअंती दोन लाख पंधरा हजार रूपये स्विकारण्याची मान्य करून सदर लाचेच्या रकमेपैकी दि.
१९/०९/२०२६ रोजी एक लाख रूपये लाचेची रक्कम तकारदार तुसीप उर्फ काल्या शेख यांचेकडुन पोलीस स्टेशन
जवळील पाण्याच्या टाकीजवळ स्विकारतांना लोकसेवक विनोद मासाळकर यांना पंचासमक्ष रंगेहाथ पकडण्यात आले
आहे. अशा प्रकारे लोकसेवक विनोद शिवाजी मासाळकर, वय ३७वर्षे, व्यवसाय नोकरी, पोलीस शिपाई, ब.नं.
२४६७, पाथर्डी पोलीस ठाणे, जि. अहिल्यानगर यांनी तपासात मदत करण्याचे प्रलोभन देवुन आपला व वरीष्ठांच्या
नावाचा प्रभाव टाकुन, स्वतःचा सांपत्तीक फायदा करून घेण्याचे हेतुने, कायदेशीर परिश्रमीका खेरीज अन्य
पारितोषण म्हणुन बेकायदेशीर मार्गाने १,००,०००/- रुपये लाच स्विकारुन भ्रष्ट व बेकायदेशीर मार्गाने स्वतःचा
आर्थिक लाभ करुन घेतला म्हणून त्यांनी भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा केला
आहे, म्हणून माझी त्यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

हि फिर्याद दिली दि.



Scanned with OKEN Scanner

२०/०९/२०२६

13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

AANAND ASHOK KOKARE(I (Inspector)) / DGPAAKM8102 or (किंवा)

(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):

Rank (पद):

to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) No.(क्र.): or (किंवा)

(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):

on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)



Scanned with OKEN Scanner

Registered by (नोंदणी अधिकारी)
**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)
**Name (नाव):** AANAND ASHOK KOI
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** DGPAAKM8102

पोलीस ठाणे अमलदार
पाथर्डी पोलीस स्टेशन

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15.Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):



Scanned with OKEN Scanner